
# रब्बी पिकातील तण व्यवस्थापन तंत्रज्ञान




**तणनाशक फवारताना घ्यावयाची काळजी :-**

१) फवारणीसाठी शक्यतो स्वतंत्र पंप वापरावा.
२) तणनाशक फवारणीपूर्वी जमिनीत पुरेसा ओलावा आवश्यक.
३) फवारणी वारा शांत असताना करावी.
४) फवारणी पंपासाठी शिफारशीनुसार नोझलचा वापर करावा.
५) फवारणीसाठी लागणेरे पाणी ठरविण्याकरिता फवारणी पंप कॅलीबरेट करून घ्यावा.
६) तणनाशके पाण्यात मिसळताना काठीचा वापर करावा, हाताचा वापर करू नये.
७) तणनाशके फवारणीसाठी स्वच्छ पाण्याचा वापर करावा.
८) अपेक्षित तण नियंत्रणाकरिता शिफारस तणनाशकाची मात्रा फवारणी क्षेत्रावर पडेल याची काळजी घ्यावी.
९) फवारणी करीत असताना सेवन, धुम्रपान किंवा डोळे चोळणे टाळावे.
१०) तणनाशक खरेदी करण्यापूर्वी संबंधित तणनाशकाचा फवारणी करावयाच्या पिकाकरिता लेबलकलेम आहे किंवा नाही, याची खात्री करावी.




**रब्बी हंगामातील पिकांचे तण व्यवस्थापन वरील पद्धतीने केल्यास मजुरावरील खर्चात बचत तर होतेच, शिवाय तणांचा बंदोबस्त वेळीच करता येणे शक्य आहे.**


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

• संकलक •

**प्रा.अमोल शास्त्री** – विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)
**प्रा.प्रदिप गोंजारी** – विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)
**डॉ. ला. रा. तांबडे** – वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**



तांत्रिक माहिती स्त्रोत
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रकाशन वर्ष : मार्च २०१७ | एकूण घडी पुस्तिका क्र.५५ | एकूण प्रकाशन क्र.६४ | प्रति : २००० | एकूण खर्च : रू.४९३०/-(कृ.वि.के.सोलापूर.)



वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
शबरी कृषि प्रतिष्ठान सोलापूर संचलित,

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**

सोलापूर-बार्शी रोड, मु.खेड, पो.केगाव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७-२५००१५३
Visit us at : www.kvksolapur.org

# रब्बी पिकातील तण व्यवस्थापन तंत्रज्ञान

तणे ही कृषि उत्पादन पद्धतीमधील प्रमुख जैविक अडथळा आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार एक तृतांशपेक्षा जास्त उत्पादनातील घट ही केवळ तणांमुळे येते. त्यामुळे पीक उत्पादनात सरासरी ३३ टक्के घट येते. या तुलनेत कीटकांमुळे २६ टक्के, रोगामुळ २० टक्के व इतर घटकांमुळे २१ टक्के घट येते. आपल्या देशाचे भरडधान्य, कडधान्य व तेलबिया पिकामध्ये प्रतिवर्षी रू.५० हजार कोटीचे नुकसान केवळ तणांमुळे होते.

**१) प्रतिबंधात्मक उपाय :-** तणांचा शेतामध्ये प्रादुर्भाव व तणांची वाढ होऊ नये म्हणून वापरल्या जाणाऱ्या पद्धतीचा समावेश प्रतिबंधात्मकमध्ये हातो. उदा.प्रमाणित बियाणाचा वापर करणे, तण विरहित बियाणे पेरणीकरिता वापरणे, पेरणीपूर्वी तणे नष्ट करणे, पूर्ण कुजलेले शेणखत / कंपोस्टखत वापरणे.

**२) निवारणात्मक उपाय :-** तणाचा प्रादुर्भाव शेतामध्ये झाल्यानंतर तणाची तीव्रता कमी करण्यासाठी वापरावयाच्या सर्व पद्धती या प्रकारात मोडतात.

१. भौतिक व यांत्रिक पद्धतीचा समावेश होतो. उदा. हाताने तण उपटणे, खुरपणे, कोळपणे, मशागत, छाटणी, आच्छा तणाचा वापर.

२. स्पर्धात्मक जलद वाढणारी पिके घेणे, योग्य पीक पद्धतीचा व योग्य पेरणी पद्धतीचा अवलंब करणे, प्रती हेक्टरी पिकाची संख्या योग्य ठेवणे. योग्य पीक फेरपालट करणे. आंतरपीक पद्धतीचा अवलंब करणे, पिकास खते व पाणी देण्याच्या सुधारित पद्धतीचा अवलंब करणे.

३ जैविक पद्धतीने तणांचे व्यवस्थापन केले जाते.

४.रासायनिक पद्धतीने तणांचे व्यवस्थापन करणे.

रासायनिक पद्धतीने योग्य तण व्यवस्थापन करताना काही महत्वाच्या तांत्रिक बाबींचे ज्ञान असणे अत्यंत महत्वाचे आहे.

१) लेबल क्लेमनुसार तणनाशकाची निवड व वापर करणे.

२) तणनाशकाचा शिफारशीत मात्रा इतकाच वापर करणे. त्यापेक्षा कमी अथवा अधिक वापर टाळणे.

३) योग्य वेळी तणनाशकांची फवारणी उदा. तणनाशकाच्या प्रकारानुसार पीक पेरणीपुर्वी तणनाशक जमिनीत मिसळणे, पीक पेरणीनंतर परंतु पीक व तण उगवण्यापुर्वी जमिनीवर तणनाशक फवारणी व पीक व तण उगवल्यानंतर तणनाशकाची पिकावर व तणावर फवारणी करणे.

४) तणनाशक फवारणी पद्धतीनुसार नोझलचा वापर करणे.



गाजर गवताचे जैविक तण नियंत्रण



ऊसामधील रासायनिक तण नियंत्रण

## पिक निहाय तण नाशकांचा वापर खालील प्रमाणे करावा.

| पिकाचे नाव | वापरावयाच्या तणनाशकाचे शास्त्रीय नाव | तणनाशकाचे प्रमाण प्रती १० लीण पाण्याकरिता | तणनाशकामुळे नियंत्रित होणारे तणांचे प्रकार | तणनाशक वापरण्याची पद्धत |
|---|---|---|---|---|
| रब्बी ज्वारी | अॅट्राझीन - ५० टक्के डब्लू.पी. | ४० ते ८० ग्रॅम | सर्व प्रकारची तणे | पीक व तणे उगवण्यापूर्वी हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी व पेरणीनंतर ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी. |
| | अॅलाक्लोर ५० टक्के इ.सी. | ८० ते १०० मि.ली | वार्षिक गवतवर्गीय व रूंद पानाची तणे | |
| | २-४-डीसोडिअम ८० टक्के डब्लू. पी. | २५ ते ३६ ग्रॅम | वार्षिक व बहुवार्षिक रूंद पानाची तणे | पेरणीनंतर ३ ते ४ आठवड्यानंतर हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| मका | अॅट्राझीन ५० टक्के डब्लू. पी. | ४० ते ८० ग्रॅम | सर्व प्रकारची तणे | पीक व तणे उगवण्यापूर्वी हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी व पेरणीनंतर ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी. |
| | अॅलाक्लोर ५० टक्के इ.सी. | ८० ते १०० मि.ली. | वार्षिक गवतवर्गीय व रूंद पानाची तणे | |
| | २-४-डी सोडिअम ८० डब्लू.पी. | २५ ते ३६ ग्रॅम | वार्षिक व बहुवार्षिक रूंद पानाची तणे | पेरणीनंतर ३ ते ४ आठवड्यानंतर हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| गहू | २-४-डी डायमेथील अमाईन क्षार ५८ टक्के ई.सी. | १७ ते २० मि.ली. | सर्व रूंद पानाची तणे | हे तणनाशक गव्हाच्या वाढीच्या अवस्थेशी संवेदनशील असल्यामुळे याची फवारणी जास्तीतजास्त फुटव्याच्या अवस्थेत करावी वेळेवर पेरणीच्या गव्हामध्ये पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी. उशिरा पेरणीच्या गव्हामध्ये ४५ ते ५० दिवसांनी करावी. |
| | २-४-डी इथील इस्टर ३८ टक्के ई.सी. | २६ ते ४४ मि.ली. | सर्व रूंद पानाची तणे | |
| | २-४-डी सोडिअम क्षार ८० टक्के डब्लू.पी. | १२ ते २५ ग्रॅम | सर्व रूंद पानाची तणे | |
| | मेट्रीब्यूझीन ७० टक्के डब्लू.पी. | ५ ते ६ ग्रॅम | जंगली ओट, केना, गवत, रूंद पानाची तणे | पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| | मेटसल्फ्युरॉन मेथाईल २० टक्के डब्लू.पी. | २.५ ग्रॅम | रूंद पानाची तणे | पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| हरभरा, मसूर व वाटाणा | ऑक्सिफ्लोरफेन २३.५ टक्के ई.सी. | ८.५ ते १७ मि.ली. | गवतवर्गीय व रूंद पानाची तणे | पेरणीनंतर पीक व तणे उगवणीपूर्वी ५०० लीटर पाण्यातून फवारावे व ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी. |
| | पेंडीमिथॅलीन ३० टक्के ई.सी. | ७० ते १०० मिली. | रूंद पानाची व वार्षिक गवतवर्गीय तणे | पेरणीनंतर पीक व तणे उगवणीपूर्वी ५०० लीटर पाण्यातून फवारावे व ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी. |
| बागायती भुईमुग | इमाझेथापर १० टक्के एस.एल. | १५ ते २० मिली. | काही रूंद व अरूंद पानाची तणे | पेरणीनंतर २० दिवसानी हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारावे |
| | पेंडीमिथॅलीन ३० टक्के ई.सी. | ७० ते १०० मिली. | रूंद पानाची व वार्षिक गवतवर्गीय तणे | पेरणीनंतर पीक व तणे उगवणीपूर्वी ५०० लीटर पाण्यातून फवारावे व ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी. |
| | अलाक्लोर ५० टक्के ई.सी. | ६० ते ८० मिली. | रूंद पानाची व काही गवतवर्गीय तणे | पेरणीनंतर पीक व तणे उगवणीपूर्वी ५०० लीटर पाण्यातून फवारावे |